RNI No. MAHBIL /2009/31733

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—अ

वर्ष ४, अंक ४८] शुक्रवार, एप्रिल १३, २०१८/चैत्र २३, शके १९४० [पृष्ठे २, किंमत : रुपये १५.००

### असाधारण क्रमांक ८६

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### विधि व न्याय विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय
मुंबई ४०० ०३२, दिनांक ४ एप्रिल २०१८

### अधिसूचना

**कौटुंबिक न्यायालय कायदा, १९८४.**

क्रमांक एफएमसी. १११६/प्र. क्र. २२२/का. ९.— कौटुंबिक न्यायालय कायदा, १९८४ (१९८४ चा ६६) कलम ३ मधील पोट-कलम (१) आणि (२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि यासंबंधी आतापर्यंत काढण्यात आलेल्या सर्व शासकीय अधिसूचना ज्या कौटुंबिक न्यायालय, अहमदनगर यांच्या न्यायालयांशी जेथवर संबंधित असतील तेथवर त्यामध्ये फेरबदल करून, महाराष्ट्र शासन, मुंबई येथील उच्च न्यायालयाशी विचार विनिमय करून दिनांक ८ एप्रिल २०१८ पासून अहमदनगर, जिल्हा अहमदनगर येथे कौटुंबिक न्यायालयाची स्थापना करीत आहे.

या न्यायालयाच्या अधिकारितेच्या स्थानिक मर्यादा अहमदनगर महानगरपालिका क्षेत्राच्या मर्यादेशी समकक्ष असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अ. श्या. कलोती,**
विधि सल्लागार-नि-सह सचिव.

**LAW AND JUDICIARY DEPARTMENT**

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 4th April 2018

*NOTIFICATION*

THE FAMILY COURTS ACT, 1984.

No. FMC 1116/C.R. 222/D-IX.—In exercise of the powers conferred by sub-sections (*1*) and (*2*) of section 3 of the Family Courts Act, 1984 (66 of 1984), and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra, in consultation with the High Court of Judicature of Bombay, with effect from the 8th day of April, 2018, hereby establishes a Family Court at Ahmednagar and specifies the local limits of the following area namely :—

(1) The area within the limits of the Municipal Corporation of the city of Ahmednagar for the purpose of exercising the jurisdiction and powers conferred by the said Act.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. S. KALOTI,
Legal Advisor-*cum*-Joint Secretary.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.